'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 81 - Indian Agriculture : Problems and Prospectus
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# नाशिक जिल्ह्यातील जमिनीची उपयोगिता व वितरण

डॉ. अनिल डी. पवार
भूगोल विभाग प्रमुख
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड, नांदगाव जि. नाशिक

**प्रस्तावना —**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला अनन्य साधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून मानव शेती करून आपला उदरनिर्वाह करीत आला आहे. मात्र बदलत्या परिस्थितीनुसार शेती हे उदरनिर्वाहाच्या साधनाबरोबरच उत्पन्न मिळविण्याचे साधन बनलेले आहे. अशा या शेतीसाठी जमिन पाणी आणि मानव यांची योग्य सांगड घातल्यास कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबरच त्या प्रदेशातील मानवाचा विकास झालेला दिसून येतो.

नाशिक हा महाराष्ट्र राज्यातील एक प्रगत असा नावलौकिक मिळविलेला जिल्हा आहे. भौगोलिक क्षेत्राच्या दृष्टीने जिल्ह्याची रचना अतिशय वैविध्यपूर्ण असून जिल्ह्याच्या पश्चिम भागामध्ये डोंगररांगा असल्याने उंच—सखल भूभाग आहे. तर पूर्व भागामध्ये गोदावरी, गिरणा, मोसम, कादवा, दारणा यासारख्या नद्यांनी सखल असा भूभाग निर्माण केलेला आहे. जिल्ह्यातील तपकिरी—तांबुस आणि जाड्या—भरडया मृदेने (डोंगराळ प्रदेश) सर्वाधिक भाग व्यापलेला असला तरी काळ्या कसदार, गाळाच्या मृदेच्या प्रदेशात अन्नधान्यात्मक, नगदी पिके, भाजीपाला वर्गीय पिके, फळबागा यांनी जिल्ह्याचे शेतीजीवन संपन्न आहे. कांदा व द्राक्ष उत्पादनासाठी जिल्ह्याची जगभर ओळख आहे.

**अभ्यासक्षेत्र —**

नाशिक जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तरभागी १९°३३'' ते २०°५३'' उत्तर अक्षांश व ७३°१६'' ते ७५°१६'' पूर्व रेखांश या भौगोलिक पट्टयात वसलेला आहे. जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १५५३० चौ. कि.मी. असून राज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या ५.०४ टक्के क्षेत्र नाशिक जिल्ह्याने व्यापलेले आहे. जिल्ह्यातील भौगोलिक क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता १२ टक्के क्षेत्र असलेला मालेगांव सर्वात मोठा तालुका असून ३.६३ टक्के क्षेत्र असलेला पेठ सर्वात लहान तालुका आहे. शासनाच्या सोयी करीता जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले आहे. जिल्ह्याची स्थापना १८६९ साली करण्यात येऊन १३ तालुक्यांचा १९९९ साली देवळा व त्र्यंबक या दोन तालुक्यांची निर्मिती झाल्याने जिल्ह्यात एकूण १५ तालुक्यांचा समावेश झालेला आहे.

नाशिक जिल्हा हा 'मिनी महाराष्ट्र' म्हणून ओळखला जातो. कारण सर्व विविधता जिल्ह्यात आढळून येते. भौगोलिक दृष्टया जिल्ह्याचे तीन विभाग केलेले आहेत. पश्चिम विभागात डोंगराळ प्रदेश, सर्वाधिक पावसाचे प्रमाण, वनांचे अच्छादन असून सुरगाणा, पेठ, त्र्यंबक तालुक्यांमध्ये कोकणातील सर्व बाबी मिळत्या जुळत्या आहेत. या भागात उत्कृष्ट प्रतिचा साग व इतर उपज मिळतात. तर जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागात ऊस, कापूस, द्राक्षे, डाळींब, भाजीपाला आणि अन्नधान्याची पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. येथील मृदा सुपिक, काळी कसदार स्वरूपाची असून हलक्या प्रतीच्या जमिनीत डाळींब, बोर, कांदे व भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. जिल्ह्यातील उत्पादित